# बृहन्मुंबई महानगरपालिका
## सार्वजनिक आरोग्य खाते
### क्षयरोग रुग्णालय समूह, शिवडी-15.
**क्र.एचओ/5827/क्षरुस(वआ) दि.18.09.2026.**

## <u>जाहिरात</u>

क्षयरोग रुग्णालय समूह, शिवडी येथे विषेषज्ञ वैद्यकिय सल्लागार 2 पदे [1 पद बालरोगतज्ञ (Pediatrician), 1 पद भुलरोग तज्ञ (Anesthesia) ] अतिदक्षतातज्ञ 1 पद निव्वळ कंत्राटी तत्वावर भरण्यासाठी खाली नमुद केलेल्या शैक्षणिक अर्हता, अनुभव व मासिक ठोस वेतन अन्वये अर्ज मागवण्यात येत आहेत.

**पदाचा कार्यकालः** नियुक्ती दिनांक ते **दि.३१.०३.२०२७**
**(कंत्राटी तत्वावर दर १७९ दिवसांनी १ दिवसाचा तांत्रिक खंड)**

| अनु. क्र | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक अर्हता- | मासिक ठोस वेतन |
|---|---|---|---|---|
| 3 | **विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार- (SMC) बालरोगतज्ञ (Pediatrician)** | **01** | संबंधित विषयामध्ये मान्यताप्राप्त विद्यापिठाची M.D./DNB पदवी (PG Degree) किंवा पदविका(PG Diploma) असावी. | रु. 1,00,000/- प्रति महिना |
| 1 | **विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार- (SMC) भुलरोग तज्ञ (Anesthesia)** | **01** | संबंधित विषयामध्ये मान्यताप्राप्त विद्यापिठाची M.D./DNB पदवी (PG Degree) किंवा पदविका(PG Diploma) असावी. | रु. 1,00,000/- प्रति महिना |
| 2 | **अतिदक्षतातज्ञ (INTENSIVIST)** | **01** | वैद्यक शास्त्रातील (General Medicine) तसेच छातीविकारशास्त्र(Respiratory Medicine/ Chest & TB), भुलरोगशास्त्र (Anesthesia), अतिदक्षता/ आपात्कालीन वैद्यकशास्त्र (Critical Care/Emergency Medicine) या विषयातील M.D./DNB पदवी (PG Degree) किंवा पदविका(PG Diploma) असावी.<br>वैद्यकशास्त्रातील पदवी( MD/DNB- General Medicine) असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.<br><br>पदव्युत्तर पदवीकाधारक (PG Diploma)उमेदवाराकडे अतिदक्षता विभागात किमान 12 महिने काम केल्याचा अनुभव आवश्यक. | PG Diploma /PG Degree- 1 वर्षापेक्षा कमी अनुभव रु. 1,25,000/-<br><br>PG Degree- 1 ते 5 वर्ष अनुभव रु. 1,35,000/-<br><br>PG Degree- 3 ते 8 वर्ष अनुभव रु. 1,50,000/-<br><br>PG Degree- 8 वर्ष पेक्षा जास्त अनुभव रु. 2,00,000/- |

★ **महत्त्वाच्या सूचना:**

**<u>तसेच वरिल अनु.क्र 1 ते 3 पदांसाठी अर्ज करणा-या उमेदवारांकडे तक्त्या मधे त्यांच्या पदांसमोर नमुद केलेल्या संबंधित अर्हतेव्यातिरिक्त खालील अतिरिक्त अर्हता असणे निवडीसाठी अनिवार्य आहे.</u>**

1. बृहन्मुंमहानगरपालिका राबवत असलेल्या HMIS प्रणाली हाताळता येणे आवश्यक आहे.
2. क्षयरुग्णालयात कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य
3. उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजीतून सहजपणे संभाषण करता येणे व स्पष्ट ऐकू येणे आवश्यक आहे.

**<u>निवडीचे निकष व कार्यपध्दती:</u>**

1. सदर पदाची विहित केलेली शैक्षणिक अर्हता व मुलाखतीच्या प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. गुणवत्ता यादीतील उमेदवारामधून निवड यादी तयार करण्यात येईल.
2. मुलाखतीचे ठिकाण, दिनांक व वेळ : अर्जदाराने अर्जात नमुद केलेल्या Email वर दोन दिवस आधी कळविणयात येईल.
3. अर्ज करण्याचा कालावधी : दि. 24.09.2026 ते 06.10.2026 (कार्यालयीन वेळ)
4. अर्जाचे शुल्क : रुपये 870 + 18% GST आहे. सदर शुल्क हे नापरतावा राहील व ते कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही.
5. अर्जाचे शुल्क भरण्याचा कालावधी : दि. 24.09.2026 ते 06.10.2026 (कार्यालयीन वेळ)

**<u>प्रमाणपत्रे:</u>**

१) पदवी, पदवृत्तर पदवी व इतर शैक्षणिक प्रमाणपत्र व उत्तीर्ण गुणपत्रीका
२) वैध एमएमसी नोंदणी प्रमाणपत्र, अतिरिक्त पात्रता नोंदणी प्रमाणपत्र व नुतनीकरण प्रमाणपत्र
३) अनुभव प्रमाणपत्र
४) आधार कार्ड आणि पॅन कार्डची प्रत
५) छायाचित्र (Photo of candidate)

**<u>सर्वसाधारणअटी:</u>**

- उमेदवारांकडे महाराष्ट्र वैद्यकीय परीषद यांची मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी / पदवीका (PG Degree/PG Diploma) तसेच त्यांचे नोंदणीकरण व नोंदणीकरणाचे नुतनीकरण बंधनकारक आहे.
- उमेदवारास संगणकाचे प्राथमिक ज्ञान असणे आवश्यक आहे व गरज पडल्यास M.S.C.I.T. अथवा तत्सम प्रमाणपत्र परिक्षा विहित कालावधीत उतिर्ण करणे आवश्यक असेल.
- उमेदवाराचा भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल आयडी अणि पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोडसह) सुस्पष्ट व पुर्ण असावा. सुस्पष्ट नसल्यास जर संपर्क साधता आला नाही तर कार्यालय जवाबदार नसेल
- कंत्राटी कर्मचा-यांना देण्यात येणारे ठोक मानधनाव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा महागाई भत्ता, घरभाडे भत्ता इत्यादी अनुज्ञेय असणार नाही.
- महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवहित महिला उमेदवार विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात.
- उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास, तसेच उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास/ शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्या बाबत माहिती देणे आवश्यक आहे.
- उमेदवारांची नेमणूक निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात प्रथम 179 दिवसांसाठी करिता असेल तसेच जर उमेदवारांचे काम समाधानकारक असेल तर कंत्राटी तत्वावर एक दिवसांचा तांत्रिक खंड देऊन पुढील 179 दिवसांसाठी पुर्न नियुक्ती करण्यात येईल.

- उमेदवार रोज नियमाने त्यांच्या कामाच्या पाळीनुसार विहीत वेळेवर दोन वेळा (In and Out time of duty shift) बायोमॅट्रिक करतील अन्यथा त्यांना गैर हजर धरण्यात येईल, त्यांची विनापरवानगी गैरहजेरी विनावेतनी गैरहजेरी (LWP) करण्यात येईल.
- उमेदवारास नियुक्त केलेल्या विभागातील सत्रांनुसार साप्ताहिक रजा तसेच परिपत्रक क्र. संचालक/वै.शि.प्र.रु/3644 दि. 14.10.2023 अनुसार 6 महिन्यांकरिता समप्रमाणात एकूण 7½ दिवस नैमित्तीक रजा अनुज्ञेय असतील, त्याव्यतिरिक्त इतर कोणतीही रजा अनुज्ञेय नसेल.
- उमेदवारांना रुग्णालय प्रशासंनानी नेमुन दिलेल्या कामव्यतिरिक्त आपात्कालीन परिस्थिती मध्ये सेवा देणे बंधनकारक आसेल.
- कंत्राटी कर्मचा-यांना रुग्णालयात कर्तव्य बजावताना संबंधीत विभागातील मार्गदर्शक तत्वे व कार्यप्रणालीचे पालन करावे लागेल तसेच न्यायवैद्यकिय (Medico Legal ) जबाबदारी घ्यावी लागेल.
- कंत्राटी कालावधीत त्यांचे काम समाधानकारक न आढळल्यास कोणतीही पूर्वसुचना न देता समाप्त करण्याचे अधिकार मा. वैद्यकिय अधिक्षक क्षयरोग रुग्णालय समुह, शिवडी यांच्याकडे राहील.
- उमेदवाराची नेमणूक करार पध्दतीची असल्यामुळे त्यांना कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.
- नियुक्तीचे वेळी उमेदवाराकडुन रु 500/- बॉड पेपरवर करारनामा करुन घेण्यात येइल.
- उमेदवार रोज नियमाने त्यांच्या कर्तव्याच्या वेळेनुसार बायोमॅट्रिक करतील अन्यथा त्यांना गैर हजर धरण्यात येईल, त्यांची विनापरवानगी गैरहजेरी विनावेतनी गैरहजेरी (LWP) करण्यात येईल.
- सदर कंत्राटी तत्वावरील पदधारकाच्या नियुक्ती कालावधीमध्ये उमेदवाराने शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.
- उमेदवाराच्या कंत्राटी तत्वावरिल नेमणूकीनंतर त्रैमासिक अनुपालन अहवाल (Performance Report) जसे की दैनंदीन उपस्थिती, दिलेल्या सेवेचा संख्यात्मक व गुणात्मक अहवाल यानुसार कंत्राटी सेवा पुढे चालू ठेवण्यात येईल.
- कोणत्याही कारणास्तव निवड झालेल्या उमेदवारास पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने 1 महीना आधि पूर्वसूचना देणे बंधनकारक राहिल.
- नियुक्त झालेल्या उमेदवारास मनापा मध्ये कायमस्वरुपी सेवेसाठी कोणताही हक्क सांगता येणार नाही तसेच त्यांना नियमित सेवेचे कोणतेही फायदे अनुज्ञेय असणार नाहीत.
- उमेदवारास मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
- सदर निवड प्रक्रिया **Walk in Inrerview** पद्धतीने क्षयरोग रुग्णालय समूह रुग्णालयाच्या प्रशासकीय कार्यालयामार्फत करण्यात येयील.
- निवड न झालेल्या पात्र उमेदवारांची प्रतिक्षायादी तयार करुन सदर प्रतिक्षायादी 31/03/2027 पर्यंत ग्राह्य धरण्यात येईल व नियुक्त झालेला कंत्राटी उमेदवारांनी राजीनामा दिल्यास, सेवा सोडुन गेल्यास अथवा विहित वेळेत रुजु न झाल्यास सदर प्रतिक्षायादीमध्ये उपलब्ध असलेल्या पुढील उमेदवारास नियुक्त करण्यास येईल.
- विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार- (SMC), अतिदक्षतातज्ञ (INTENSIVIST) यांची कंत्राटी पदे रिक्त झाल्यास विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार- (SMC), अतिदक्षतातज्ञ (INTENSIVIST) यांच्या प्रतिक्षायादितुन सदर पदे भरण्यात येतील.
- निवडप्रकिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यांत येईल. तसेच नियुक्ती झालेली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यांत येईल.
- क्र. एचओ/26403/लेखा. दि. 12.03.2026 (सार्वजनिक आरोग्य खात्याच्या अख्त्यारीतीतील संकीर्ण शुल्बाबत) नुसार अर्जदारांनकडुन 870/- + GST अर्ज शुल्क वसुल करण्यात येईल. अर्जदाराने क्षयरोग रुग्णालय समूह, शिवडी येथिल कार्यालयातून चलन घेऊन अर्जाचे शुल्क रू. 870/- + 18% GST महानगरपालिकेच्या एफ साउथ, परळ येथिल नागरी सुविधा केंद्रात (CFC) रोखीत भरावे व शुल्क भरल्याची पावती विहीत कालावधीत सादर करावी.

- प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव निवडप्रकिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा. वैद्यकिय अधिक्षक क्षयरोग रुग्णालय समुह, शिवडी यांनाआहेत.

**<u>कर्तव्ये व जबाबदा-या</u> :-**

**<u>विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार- (SMC) बालरोगतज्ञ (Pediatrician) यांची कर्तव्यसूची-</u>**

1) दररोज सकाळ व संध्याकाळ (9.00 ते 4.00) बालरोग विभागात फेरी मारुन रुग्ण तपासणे.
2) कनिष्ठ डॉक्टरांना योग्य तो सल्ला देणे.
3) दररोज 10.00 ते 12.00 या वेळेत बाह्यरुग्ण विभागात बसून बालक्षयरोग रुग्ण तपासणे.
4) 24x7 भ्रमणध्वनीवर उपलब्ध राहणे.
5) क्षयरोग रुग्णालयातील उपलब्ध असलेल्या सेवांच्या क्षमतेचा पूर्णत: वापर करणे.
6) सर्व निवासी, बंधपत्रित तसेच निम्नवैदयकीय कर्मचारी वर्गाला मार्गदर्शन करणे तसेच त्याच्या कामाचे पर्यवेक्षण करणे.
7) रुग्णालयीन कामकाजाचा आढावा व पुनर्विलोकन करण्यास प्रशासनास सहाय्य करणे.
8) वरिष्ट पातळीवरुन वेळोवेळी नेमुन दिलेल्या जबाबदा-या पार पाडणे, वैदयकीय अधिक्षक व खातेप्रमुख यांना वेळोवेळी अहवाल सादर करतील.

**<u>विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार यांच्या कर्तव्ये व जबाबदा-या</u> :-**

1) विशेषज्ञ वैदयकीय सल्लागार (Specialty Medical Consultants) क्षयरोग रुग्णालय प्रमूखांच्या अधिपत्याखाली कर्तव्यार्थ राहतील.
2) विशेषज्ञ वैदयकीय सल्लागार संबधीत युनिटमध्ये पूर्णवेळ (सकाळी ८.०० ते दूपारी ४.००) कार्यरत राहतील व रुग्णसेवेच्या आवश्यकतेनूसार रात्रपाळीतही कार्यरत राहतील. गरज भासल्यास आपातकालीन परिस्थितीत इतर विभागातही रात्रपाळीतही आवश्यक सेवा म्हणून काम करावे लागेल.
3) विशेषज्ञ वैदयकीय सल्लागार (Specialty Medical Consultants) यांची रुग्णसेवेच्या आवश्यकतेनुसार क्षयरोग रुग्णालय अंर्तगत येणा-या इतर क्षयरोग चिकित्सालयात रुग्णसेवा देणे बंधनकारक असेल.
4) विशेषज्ञ वैदयकीय सल्लागार आपातकालीन काळात रुग्ण सेवा देण्यासाठी उपलब्ध असतील.

**<u>अतिदक्षतातज्ञ (Intensivist) डॉक्टर यांची कर्तव्यसूची</u> :-**

1. चक्रांकित पद्धतीने दिवस रात्र पाळीमध्ये अतिदक्षता विभाग (IRCU) सांभाळणे.
2. वैद्यकीय अधिकारी (IRCU) यांना मार्गदर्शन करणे व त्यांच्या कामकाजावर लक्ष ठेवणे.
3. अतिदक्षता विभागात भरती होणा-या रुग्णांची Case History घेणे, दररोज तपासणी करणे व त्यांची Indoor Paper वर नोंद करणे.
4. वैद्यकीय अधिकारी (IRCU) यांच्याकडून अशक्य झालेली कामे पूर्ण करणे.
5. अतिदक्षता विभागातील रुग्णांना Intubation करणे, Bi-PAP मशीन, NIV मास्क लावणे.
6. सर्व रुग्णांची वेळोवेळी Monitoring करणे.
7. गरज भासल्यास बाह्यरुग्ण/आंतररुग्ण विभागात जाऊन तपासणी करणे व आवश्यकता भासल्यास अशा रुग्णांना अतिदक्षता विभाग (IRCU) मध्ये भरती करुन घेणे.
8. IRCU मधील रुग्णांच्या तब्येतीचा गोषवारा विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार (SMC)अतिदक्षता विभाग (IRCU) यांना देणे व त्यांच्यासोबत आंतररुग्ण कक्षामध्ये भेट देणे.
9. अतिदक्षतातज्ञ (Intensivist) यातिल कोणी डॉक्टर्स निर्धारित रजेव्यतिरिक्त अपरिहार्य कारणाने अनुपस्थित असतील तसेच रजा राखीव (Leave Reserve) डॉक्टर्स सुद्धा कमी पडत असतील तर अनुपस्थित डॉक्टरांचे वेतन त्याप्रमाणामध्ये कापून घेण्यात येईल व त्यांच्या जागी काम करणा-या अन्य डॉक्टरांना त्या दिवसाची पूरक रजा (Compensatory off) देण्यात येथील तसेच आळीपाळीने एक साप्ताहीक रजा (weekly off) देण्यात येईल.

10. अतिदक्षतातज्ञ (Intensivist) आपातकालीन काळात रुग्ण सेवा देण्यासाठी व कक्ष तसेच बाह्य रुग्ण विभाग येथे रुग्ण सेवा देण्यासाठी उपलब्ध राहणे बंधनकारक असेल.

1. **विशेष सुचनाः**

2. दि. 24.09.2026 ते 06.10.2026 या कालावधी व्यतिरिक्त संबंधित कार्यालयात किंवा अन्य ठिकाणी सादर केलेले/प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

3. अर्जाचे विहित मुल्य भरुन त्याची पावती जोडल्याशिवाय अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाहीत.

4. बृहन्मंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचाअधिकार दिलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी..

5. टपालने आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

6. सोबत : अर्जाचा नमुना

Sd/-
**वैद्यकिय अधिक्षक**
**क्षयरोग रुगणालय समुह**

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## सार्वजनिक आरोग्य खाते

## क्षयरोग रुग्णालय समूह, शिवडी-15.

**दि. …./…../2026**

**<u>अर्जचा नमुना</u>**

उमेदवाराने त्यांचे अलिकडे काढलेले पारपत्र आकाराचे छायाचित्र लावून फोटोवर स्वाक्षरी करावी

२.५से.मी X ३से.मी

पदाचे नाव:

प्रति,
वैद्यकिय अधिक्षक
क्षयरोग रुगणालय, समुह
जेरबाई वाडिया रोड, शिवडी
मुंबई - 400015

बृहन्मुंबई महानगरपालिकेत क्षयरोग रुगणालय समुह, शिवडी, मुंबई -15 मध्य ____________________ पदाकरिता दिनांक _______________ च्या जाहिराती नुसार मी खाली सही करणार विनंती अर्ज करतआहे. माझी सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे :

1) संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) :
   ____________________________________________________________
2) पत्ता (कायमचा) :
   ____________________________________________________________
   ____________________________________________________________
3) पत्ता (पत्रव्यवहाराचा) :
   ____________________________________________________________
4) पदाचे नाव : ________________________________
5) जन्मदिनांक : ______________________________
6) वजन : ____________ किलो       उंची : ____________ सें.मी.
7) वय : _______________
8) शैक्षणिकअर्हता :
   ____________________________________________________________

मी यान्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो / करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांवर व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास माझी काहीही तक्रार राहणार नाही.

सोबत : प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रति

**आपला / आपली**

**विश्वासू**

**अर्जदाराची सही**

**(अर्जदाराचे नाव)**

# बृहन्मुंबई महानगरपालिका
## सार्वजनिक आरोग्य खाते
## क्षयरोग रुग्णालय समूह, शिवडी-15.

दि. ..../...../2026

## <u>वैयक्तिक माहितीपत्र (BIO-DATA)</u>

1) संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) :

______________________________________________________________

2) वडिलांचे संपूर्ण नाव :

______________________________________________________________

3) विवाहापूर्वी चे संपूर्ण नाव (महिलांकरिता) :

________________________________________

4) पत्ता : ________________________________________________________

______________________________________________________________

5) दूरध्वनी क्रमांक : ____________________

6) इ- मेल आयडी : ____________________

7) लिंग – पुरुष ________ स्त्री __________

8) जन्मदिनांक :दिनांक_________ महिना _______ वर्ष _________

दिनांक _________ रोजी असलेले वय _______ महिने ________ दिवस _______

9) शैक्षणिकअर्हता:

| **शैक्षणिकअर्हता** | **शालांत परीक्षामंडळ / विद्यापीठाचे नाव** | **गुणांचा तपशील** | | | **उच्चमाध्यमिक शालांत परीक्षेतील गुण** | | **उमेदवार किती प्रयत्नात परीक्षा उत्तीर्ण झाला** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **प्राप्तगुण** | **पैकी** | **टक्केवारी** | **मराठी** | **इंग्रजी** | |
| दहावी | | | | | | | |
| बारावी | | | | | | | |
| पदवी | | | | | | | |
| पदविका | | | | | | | |
| पदव्युत्तर | | | | | | | |
| फेलोशिप | | | | | | | |

10) अनुभव: ______________________________________________

11) स्थानिक पोलीस ठाण्याचा पूर्ण पत्ता :

________________________________________________________

________________________________________________________

12) उंची : _______ फूट ______ इंच , वजन : ___________ कि.ग्र.

13) संगणकविषयक ज्ञान : एम.एस.सी.आय.टी (MS-CIT) किंवा शासनाने विहित केलेल्या संगणकविषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र : आहे / नाही

14) उमेदवार सध्या नोकरी करीत आहे किंवा नाही ? आहे / नाही

असल्यास त्या बाबतचा तपशील :

__________________________________________

________________________________________________________

__

15) उमेदवारविरुध्द पोलीस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित / प्रस्तावितआहे का ? असल्यास त्या बाबतचा तपशील द्यावा. आहे / नाही

16) उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ? शिक्षा झाली असल्यास, शिक्षेचा तपशील नमूद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रतअर्जासोबत जोडण्यात यावी. आहे / नाही

**आपला / आपली**

**विश्वासू,**

**अर्जदाराची सही**

**(अर्जदाराचे नाव)**

**दिनांक :**